दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● सोमवार दि.१ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 1 September 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 17 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# दोन समाज झुंजवणे योग्य नाही, संविधानाच्या चौकटीतच तोडगा काढावा लागणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई (वृत्तसंस्था)**–दोन समाजात तेढ निर्माण करणे आमच्या तत्त्वात बसत नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. एका समाजाला संतुष्ट करण्यासाठी दुसऱ्या समाजाला असंतुष्ट करणे सरकारला मान्य नसल्याचेही ते म्हणालेत. सगळ्याचे समाधान काढण्यावर आमचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी म्हटले. राज्यात युती आणि महायुतीच्या सरकारनेच मराठा समाजासाठी चांगले निर्णय घेतल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.मराठ आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे मुंबईतील आझाद मैदानात उपोषणाला बसले आहेत. आज त्यांच्या उपोषणाचा दुसरा दिवस आहे. या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातून मोठ्या संख्येने मराठा बांधव जमले आहेत. दुसरीकडे, सरकारने या प्रश्नावर चर्चेसाठी पुढाकार घेतला आहे. मराठा आरक्षणासाठीच्या शिंदे समितीचे प्रमुख, माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे, चर्चेसाठी आझाद मैदानात पोहोचले आहेत. मात्र, त्यांच्यासोबतची चर्चा निष्फळ ठरली. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एबीपी माझाशी बोलताना सरकारची भूमिका स्पष्ट केली.मराठा आरक्षणाच्या आंदोलनासंदर्भात सरकारची भूमिका पहिल्या दिवशीपासून स्पष्ट असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. २०१४ पासून ते २०२५ पर्यंत मराठा समाजाच्या हिताचे निर्णय आमच्या सरकारनेच घेतले. आरक्षणाचा विषय असेल, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ असेल, या महामंडळाद्वारे आज दीड लाख उद्योजक, जे नोकऱ्या देणारे मराठा तरुण तयार करु शकलो. सारथीमुळे एमपीएससी आणि युपीएससीमध्ये मराठा तरुणांचा टक्का वाढलेला आहे, शिक्षण आणि रोजगार या प्रश्नावर आपण निर्णय घेतलेले आहेत. आपण दिलेले १० टक्के टिकलेले आहे. पण, काहींची वेगवेगळी मते आहेत, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.कोणत्या राज्याला वाटत असेल की, आपल्या राज्यातील मोठा घटक असंतुष्ट राहावा, त्याच काय फायदा आहे. पण, एकाच्या संतुष्टीकरता दुसऱ्याला त्याच्यासमोर भांडणासाठी उभे करा, दुसऱ्याला असंतुष्ट करा हे आम्हाला मान्य नाही. राजकारण चुलीत गेले पण अशाप्रकारे समजा-समाजामध्ये तेढ निर्माण करणे हे आमच्या तत्त्वात कुठेही बसत नाही. म्हणून, सगळ्याचे समाधान कसे निघेल असा आमचा प्रयत्न आहे, ते संविधानाच्या चौकटीत बसवून काढावे लागेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. आपण कुणाला तरी आनंद देण्याची आज एखादी गोष्ट केली, तर उद्या अधिक जोराने त्याचा बॅकक्लॅश आपल्याकडे येईल, त्यामुळे संविधानाच्या चौकटीतून जे काही निर्णय करायचे आहे ते आपल्याला करायचे आहेत, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आरक्षणाच्या प्रश्नावर स्पष्टपणे भूमिका मांडली.

## पालकमंत्री अजित पवार आपण लक्ष घाला
# बीडीओ केंद्रे कडून घरकुल चेक वाटपात भेदभाव-विष्णू मुंडे

**परळी । प्रतिनिधी**

परळी पंचायत समितीमध्ये अनेक वर्षापासून मुंडे कुटुंबीयांची सत्ता आहे. त्यामध्येच राज्याच्या मंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे पंचायत समितीमध्ये अनेक वर्षापासून त्यांच्या समर्थकांच्या हातात सत्ता आहे. ते फक्त जवळच्या समर्थक व कार्यकर्त्यांचे घरकुल मंजूर करून त्यांनाच घरकुल चे चेक देत आहेत असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते विष्णू मुंडे यांनी केला आहे.



राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री या प्रकरणाकडे लक्ष द्यावेत.

घरकुल मंजूर लाभार्थी जर विरोधी गटातला असला तर त्याला कसल्याही प्रकारचे सहकार्य पंचायत समिती परळी मध्ये केलं जात नाही. त्या लाभार्थ्याला एक तर पैशाची मागणी केली जाते किंवा पंचायत समितीच्या कार्यालयात चकरा मारून चप्पल झिजून जातो. परंतु त्याचे काम होत नाही. ते जाणीवपूर्वक विरोधक असल्यामुळे केले जात नाही. असा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीचे विष्णू मुंडे यांनी केला आहे. आठ दिवसात चेक वितरित न झाल्यास अनोखे आंदोलन पंचायत समिती समोर व माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या कार्यालय समोर करण्यात येणार असल्याचा इशारा विष्णू मुंडे यांनी एका पत्रका द्वारे केला आहे.

# सातपुड्याच्या कुशीत आदिवासींनी जपली 'निसर्गाशी सहजीवनाची' अनोखी परंपरा
## 'वाघदेव' आणि 'निलीचारी' ची पूजा संपन्न

**मोलगी । रवींद्र वळवी**

सातपुड्याच्या घनदाट वनराईत, देवमोगरा पुनर्वसन येथील नदीकाठावर नुकताच एक अनोखा सोहळा पार पडला. निसर्ग आणि मानवी जीवनातील अतूट नाते अधोरेखित करणारी ही 'वाघदेव आणि निलीचारी' पूजा आदिवासी संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे.



या पूजेच्या वेळी पुजारा काकड्या भोंग्या वसावे यांच्या उपस्थितीत नऊ राणी पुजारांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले. पानांच्या पात्रांमध्ये अन्न, जल आणि श्रद्धा अर्पण करून ही पूजा संपन्न झाली.ही पूजा केवळ एक धार्मिक विधी नसून निसर्गरक्षण, सजीवता आणि सहजीवनाची सखोल जाणीव देणारी एक सुंदर परंपरा आहे. या परंपरेनुसार, वाघदेव हे शक्ती, संरक्षण आणि अरण्याचे प्रतीक मानले जातात. निसर्ग आणि वनसंपदा हीच खरी संपत्ती आहे या आदिवासी समाजाच्या तत्त्वज्ञानाचे दर्शन या पूजेतून घडते.संपूर्ण समुदाय एकत्र येऊन सामूहिकतेनं साजरी होणारी ही परंपरा आदिवासी संस्कृतीचा आत्मा आहे. निसर्ग हाच देव, आणि सहअस्तित्व हीच पूजा या तत्त्वज्ञानावर आधारित ही सुंदर परंपरा जपणे ही काळाची गरज आहे, असे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# १९ जणांचे रक्तदान, महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळाचा स्तुत्य उपक्रम



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील देशपांडे गल्लीत असलेले महाराष्ट्र सांस्कृतिक गणेशमंडळ हे स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेले असून मागील कित्येक वर्षां पासून मंडळ सामाजिक उपक्रम राबवत आहे. शनिवारी या मंडळातर्फे घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात १९ जणांनी रक्तदान केले व हे रक्त शासकीय रुग्णालयाच्या रक्तदान महालॅबला दिले. रक्तदान शिबिरात शैलेष गोस्वामी,सागर दिक्षित, मनोज जोशी,अवधूत देशपांडे,डॉ.प्रज्वल देशपांडे,अमिर नवाब, अक्षय देशपांडे,स्वप्नील पत्की,सुमित केजकर, अजिंक्य सावरगांवकर, अमोघ कुलकर्णी,अनंत औटी,मंदार आराध्ये, आर्य झक्कर,अनिरुद्ध सावरगांवकर,स्वप्नील स्वामी,समर्थ पोकळे पुराणिक यांनी रक्तदान केले.त्यांचे रक्त हे स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालयाच्या महालॅबला पाठवण्यात आले आहे. रुग्णालयाच्या रक्त पेढीत संकलित केले आहे.

# नांदेडमध्ये सामाजिक कार्यकर्ते उमाकांत पाटील यांचा गौरव

**नांदेड । प्रतिनिधी**

आदिवासी आणि गरजू लोकांसाठी केलेल्या अतुलनीय सामाजिक कार्याबद्दल नंदुरबार जिल्ह्याचे सामाजिक कार्यकर्ते उमाकांत शिवाजी पाटील यांचा नांदेड येथे सत्कार करण्यात आला. माजी केंद्रीय ग्रामीण विकास राज्यमंत्री आणि माजी खासदार सूर्यकांता पाटील यांच्या हस्ते हा गौरव पार पडला.

मूळचे गाव शेल्टी, तालुका शहादा येथील रहिवासी असलेल्या उमाकांत पाटील यांना सूर्यकांता पाटील यांनी शाल, फुलहार आणि श्रीफळ देऊन सन्मानित केले. यावेळी बोलताना सूर्यकांता पाटील यांनी उमाकांत पाटील यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. त्या म्हणाल्या, उमाकांत पाटील कोणत्याही प्रकारचा जातीभेद किंवा धर्मभेद न करता, नेहमीच गोरगरीब आणि आदिवासी जनतेच्या मदतीसाठी पुढे येतात. त्यांचे हे कार्य खरोखरच प्रशंसनीय आहे.



या सत्काराने पाटील यांना सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात आणखी काम करण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास सूर्यकांता पाटील यांनी व्यक्त केला. त्यांनी पाटील यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अज्ञात वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वार मिस्त्री ठार

**केज । गौतम बचुटे**

रस्त्याच्या वळणावर समोरून भरधाव वेगात आलेल्या अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने या अपघातात मिस्त्री काम करणारा तरुण ठार झाला असून त्याचा साथीदार किरकोळ जखमी झाला आहे. हा अपघात केज - मांजरसुंबा रस्त्यावरून सांगवी - सारणी दरम्यान रविवारी (दि. ३१) सकाळी ९.३० वाजेच्या सुमारास घडली.




परळी शहरातील जमालपुरा बंगला भागातील गफार गजम शेख (वय ३५) हा तरुण मिस्त्री काम करीत होता. रविवारी सकाळी ९.३० वाजेच्या दरम्यान गफार हा आपल्या साथीदारासह केजहून दुचाकीवर अमळाचा बरड येथे अवादा कंपनीच्या एका कामावर निघाला होता. ते केज - मांजरसुंबा रस्त्यावरून जात असताना सांगवी - सारणी दरम्यान असलेल्या वळणावर समोरून भरधाव वेगात आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या झालेल्या अपघातात गफार शेख हे जागीच ठार झाले. तर त्यांचा साथीदार किरकोळ जखमी झाला असून त्याच्यावर अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेची माहिती मिळताच सहाय्यक फौजदार शंभुदेव दराडे, पोलीस नाईक प्रकाश मुंडे यांनी घटनास्थळी धाव घेतली. येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करून गफार शेख याचा मृतदेह नातेवाईकांकडे सुपूर्द करण्यात आला. जमादार राजू वंजारे, जमादार उमेश आघाव हे दुचाकीला धडक देऊन निघून गेलेल्या वाहनाचा शोध घेत आहेत.

# बाबुरावजी आडसकर महाविद्यालयात जिल्हास्तरीय वक्तृत्व व निबंध स्पर्धेचे आयोजन

**केज । प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस संचलित बाबुरावजी आडसकर महाविद्यालय येथे सांस्कृतिक विभाग व भाषा विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय वक्तृत्व व निबंध स्पर्धेचे आयोजन ३ सप्टेंबर रोजी करण्यात आले आहे. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सामाजिक व भाषा विषयक ज्ञान वृद्धीसाठी सामाजिक व शैक्षणिक विषयावर जिल्हास्तरीय वक्तृत्व व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये इयत्ता आठवी ते पदवी पर्यंतचे सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी होऊ शकतात. स्पर्धा विनाशुल्क आहे . जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा दिनांक ३ सप्टेंबर २०२५ रोजी सभागृह बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज या ठिकाणी सकाळी दहा वाजता होणार आहे निबंध स्पर्धेचे विषय तीन ठेवण्यात आले आहेत यापैकी एका विषयावर स्पर्धकांनी निबंध लिहायचा आहे. या विषयापैकी मोबाईलचा वापर अभ्यास पूरक किंवा मारक, आजचा विद्यार्थी व संस्कार, माझा शेतकरी बाप जगाचा पोशिंदा जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी लोकनेते बाबुरावजी आडसकर साहेब कार्य व कर्तुत्व , आजचे राजकारण व लोकशाही, जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेसाठी यापैकी एका विषयावर मराठी , हिंदी किंवा इंग्रजी भाषांमध्ये स्वहस्ताक्षरात निबंध लिहून दिनांक ३ सप्टेंबर २०२५ रोजी पर्यंत स्वहस्ते किंवा पोस्टाने भाषा विभाग, बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज जिल्हा बीड या पत्त्यावर पाठवावा. वक्तृत्व स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांचे ओळखपत्र गरजेचे आहे. जिल्हास्तरीय वक्तृत्व व निबंध स्पर्धेमध्ये प्रथम , द्वितीय व तृतीय क्रमांक येणाऱ्या स्पर्धकांना रोख रक्कम, प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त शाळा महाविद्यालयाने सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना या स्पर्धेमध्ये सहभागी करावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ माधव फावडे, संयोजक डॉ. चत्रभुज सोळंके , डॉ. रामचंद्र केदार , डॉ. मनोज माने, डॉ. सुनील राऊत, डॉ. प्रशांत क्षीरसागर , डॉ. प्रकाश खुळे, डॉ. आशा बोबडे , डॉ. बाबासाहेब हिरवे , संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



संपादकीय

# बदल घडवणारी पूजा



पूजा आठवीतील वर्गात शिकत असताना शाळेशेजारी धान्य मळणीचं काम सुरू होतं. या मळणी यंत्रातून धान्याचा भुसा उडायचा. हवेसोबत हे भुशाचे कण वर्गात यायचे. त्यामुळे मुलांना खोकला येत असे. शेती क्षेत्रात धान्य मळणीचे यंत्र सर्रास वापरले जाणारे यंत्र आहे. पण हे यंत्र आरोग्यास धोकादायक देखील आहे. ग्रामीण भारतात, या धुळीच्या संपर्कात आल्याने दीर्घकालीन खोकला, श्वसनाचे त्रास, ॲलर्जी आणि श्वसन संक्रमण होऊ शकते. विशेषतः लहान मुले आणि शेतमजुरांमध्ये याचे प्रमाण जास्त आढळते. पूजाने ही बाब हेरली. या धुळीपासून रक्षण करण्यासाठी तिने एक यंत्र विकसित केले. या अभिनव प्रयोगामुळे तिने जपानमध्ये पार पडलेल्या विज्ञान प्रदर्शनात भारताचे प्रतिनिधीत्व केले. तालुक्याच्या ठिकाणी सुद्धा न गेलेल्या पूजाचा हा प्रवास प्रेरणादायी आहे.

उत्तर प्रदेशातील बाराबंकी जिल्ह्यातील सिरौली गौसपूर तहसील भागातील अगेहरा या छोट्याशा गावात पूजा पाल राहते. पूजा ही कुटुंबातील पाच मुलांपैकी एक आहे. तिचे वडील, पुट्टीलाल, रोजंदारीवर काम करणारे कामगार आहेत आणि तिची आई, सुनीला देवी, गावातील सरकारी शाळेत मध्यान्ह जेवण बनवते. मातीच्या भिंती आणि गवताने साकारलेले छप्पर असं तिचं घर. वर्षानुवर्षे पूजाच्या घरात वीज नव्हती. रॉकेलच्या दिव्यावर ती आणि तिची भावंडे अभ्यास करत असत. तिचे आई-बाबा नेहमी म्हणत ‘आम्ही कमी खाऊ, पण तुम्ही सर्वांनी अभ्यास केला पाहिजे. कारण शिक्षणच तुम्हाला पुढे घेऊन जाईल.’आठवी इयत्तेत शिकत असताना पूजाच्या लक्षात आले की, तिच्या शाळेतील मुले जवळच्या मळणी यंत्रातील धुळीमुळे खूप खोकतात. हवा बारीक भुसाच्या कणांनी भरलेली होती जी या मुलांच्या फुप्फुसांत जाई. हाच त्रास शेत मजुरांनादेखील होत असे. ती धूळ पूजाच्या मनात बसली. तिने स्वतःला विचारले, आपण याबद्दल काही करू शकतो का? यावर काहीतरी तोडगा काढला पाहिजे.काहीतरी कृती करण्याचा निर्धार करून, तिने तिच्या शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आणि एका वेल्डरच्या मदतीने एक मॉडेल यंत्र तयार करण्यास सुरुवात केली. या यंत्राच्या अनेक चाचण्या केल्या. अनेक चुका झाल्या त्या सुधारल्या. असे करत तिने एक धूळमुक्त थ्रेशर तयार केले. एक डब्बा आणि पंखा यांच्या मदतीने उडणारी धूळ एका पाण्याच्या पिशवीमध्ये जमा होत असे. असे हे यंत्र होते. या यंत्रासाठी ३ हजार रुपये खर्च आला. हा खर्च पूजाच्या कुटुंबासाठी फार मोठा होता. गावातील लोक पूजाची थट्टा करायचे. ‘तू हे का करत आहेस? तुला काय मिळेल?’ असे ते म्हणायचे. पूजाने त्यांच्याकडे दुर्लक्ष करून आपल्या कामावर लक्ष दिले.पूजाचे विज्ञान विषयाचे शिक्षक राजीव श्रीवास्तव यांनी तिला तिचा प्रकल्प इनस्पायर मानक (खछडझखठए - चअछअघ) मध्ये सादर करण्यास मदत केली. भारताच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने सुरू केलेला, खछडझखठए (इनोव्हेशन इन सायन्स पर्सुइट फॉर इन्स्पायर्ड रिसर्च) हा तरुण वैज्ञानिक मनांना जागृत करण्यासाठी एक राष्ट्रीय कार्यक्रम आहे. इयत्ता सहावी ते दहावीपर्यंतचे विद्यार्थी स्थानिक पातळीवर रुजलेल्या कल्पना सादर करू शकतात जे वास्तविक जगातील समस्या सोडवतात. निवडलेल्यांना मार्गदर्शन आणि प्रोटोटाइप तयार करण्यासाठी अनुदान मिळते, जे नंतर जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर प्रदर्शित केले जातात.२०२३ मध्ये, पूजा पालचा शोध भारतातील हजारो प्रवेशिकांमधून निवडला गेला. ६० राष्ट्रीय विजेत्यांपैकी, ती उत्तर प्रदेशातील एकमेव होती. तिचे धूळमुक्त थ्रेशर मॉडेल २०२४ मध्ये राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात प्रदर्शित करण्यात आले होते. या यंत्राने त्याच्या कमी किमतीच्या, उच्च-प्रभावाच्या डिझाइनसाठी प्रशंसा मिळवली. विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय आता तिच्या मॉडेलचे पेटंट घेण्यासाठी काम करत आहे. हा ग्रामीण विद्यार्थ्यासाठी एक दुर्मीळ सन्मान आहे.२०२५ मध्ये पूजाची जपानमधील साकुरा सायन्स हायस्कूल प्रोग्रामसाठी निवड झाली. जपान सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी एजन्सी (जेएसटी)द्वारे हा एक प्रतिष्ठित उपक्रम आहे जो जगभरातील अव्वल विज्ञान विद्यार्थ्यांना एका आठवड्यासाठी एकत्रितपणे शिक्षण आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीसाठी एकत्र आणतो. भारतातील हजारो नामांकित विद्यार्थ्यांपैकी फक्त ५४ विद्यार्थ्यांची निवड झाली. या ठिकाणी सुद्धा पूजा ही उत्तर प्रदेशातील एकमेव विद्यार्थिनी होती.विज्ञान उपक्रमांना उपस्थित राहण्याव्यतिरिक्त, विद्यार्थ्यांना टोकियोच्या सहलीवर देखील नेण्यात आले. पूजासाठी, हा एक अविस्मरणीय अनुभव होता. जपानी माणसांची अदब, पाहुणचार, कमालीचा नम्रपणा तिच्या मनाला भावला.बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर, पूजाला एक छोटासा व्यवसाय सुरू करायचा आहे. या व्यवसायाच्या माध्यमातून तिला तिचा महाविद्यालयीन शिक्षणाचा खर्च स्वतःच उचलायचा आहे. त्याचसोबत आपल्या आई-वडिलांना आर्थिक मदत सुद्धा करायची आहे. पूजा म्हणते की, तिला इतके मोठे व्हायचे आहे की जे लोक एकेकाळी आपल्याला तुच्छ मानत होते त्यांना आपली खरी क्षमता दाखवून द्यायची आहे.आपण कोणत्या परिस्थितीत वाढलो हे महत्त्वाचे नाही तर आपण आपली परिस्थिती बदलण्यासाठी काय प्रयत्न करतो हे महत्त्वाचे आहे. पूजा पालने स्व-कर्तृत्वाने हे सिद्ध केले.

# सोशल मिडियावरील चिखलफेक थांबणार का?




सोशल मिडियाने आपल्या संवादपद्धतीत अभूतपूर्व बदल घडवून आणले आहेत. जगभरातील घडामोडी, विचार, भावना आणि मते एका क्षणात लाखो लोकांपर्यंत पोहोचतात. संवादाचे हे स्वातंत्र्य निश्चितच लोकशाहीसाठी महत्त्वाचे आहे; पण गेल्या काही वर्षांत सोशल मिडियाचा हा खुला मंच अनेकदा वैयक्तिक आरोप-प्रत्यारोप, अफवा, आणि चिखलफेकीचे साधन ठरू लागला आहे. कुठल्याही व्यक्तीबद्दल, घटनेबद्दल किंवा विषयाबद्दल विचार मांडणे ही लोकशाहीची खूण आहे; मात्र या अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा गैरवापर झाल्यास त्यातून नकारात्मकता पसरते. खोट्या माहितीचा प्रसार, अपमानजनक शब्दांचा वापर, ट्रोलिंग संस्कृती - या सर्व गोष्टींनी सोशल मिडियावरील संवादाचा दर्जा घसरला आहे. परिणामी समाजात तणाव, अविश्वास, आणि मानसिक आरोग्याशी संबंधित समस्या वाढताना दिसतात.या परिस्थितीत उपायांची जबाबदारी केवळ सरकार किंवा सोशल मिडिया कंपन्यांवर टाकून भागणार नाही. कायद्यांचा योग्य वापर आणि कडक अंमलबजावणी महत्त्वाची आहेच; पण त्यासोबतच प्रत्येक वापरकर्त्याने सजगपणे सोशल मिडियाचा वापर करणे आवश्यक आहे. डिजिटल साक्षरता, माहितीची पडताळणी करण्याची सवय, आणि संयमित भाषाशैली ही प्रत्येकाने अंगी बाणवली, तर चिखलफेक नैसर्गिकरित्या कमी होऊ शकते. तंत्रज्ञान हे साधन आहे; त्याचा उपयोग कसा करायचा, हे ठरवणे आपल्याच हातात आहे. सोशल मिडियाने संवादाचे दरवाजे खुल्या केले आहेत, पण हे दरवाजे संस्कृती, संवेदनशीलता आणि परस्पर आदर यांच्या अधिष्ठानावरच टिकू शकतात. म्हणूनच आजची खरी गरज आहे ती आत्मपरीक्षणाची - आपण सोशल मिडियावर कोणते वातावरण निर्माण करतो आहोत, याचा विचार करण्याची.चिखलफेक थांबवण्यासाठी कायदे आणि नियम मदत करू शकतील; पण खरा बदल तेव्हाच घडेल, जेव्हा प्रत्येक नागरिक जबाबदार डिजिटल नागरिक म्हणून वागेल. आपला प्रत्येक शब्द, प्रत्येक पोस्ट ही सकारात्मकतेचा संदेश देणारी ठरली, तर सोशल मिडिया हे विभाजनाचे नाही, तर एकतेचे व्यासपीठ बनेल.

# विद्यार्थ्यांनी मोबाइलचा अतिवापर टाळावा



मोबाइलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. ही त्यांच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून धोक्याची घंटा आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे सुजाण नागरिक आहेत. त्यामुळे त्यांनी मोबाइलचा अतिवापर टाळावा. आपल्याकडे अपेक्षेप्रमाणे मोबाइलच्या अतिवापरा संदर्भातील दुष्परिणामाबाबत जनजागृती होत नाही. ती होणे गरजेचे आहे.

पल्या लोकशाहीप्रधान भारत देशाचा १५ ऑगस्ट २०२५ रोजी ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहाने आणि विविध कार्यक्रमांनी साजरा झाला. म्हणजे आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे पूर्ण झाली. मात्र मोबाइलचा विचार करता वैज्ञानिक युगात वावरणारे आजचे विद्यार्थीवर्ग मोबाइलचा अतिवापर करताना दिसत आहेत. मोबाइलच्या अतिवापरामुळे मुलांची विचार करण्याची शक्ती हळूहळू कमी होते. काही वेळा आपण काय करावे आणि काय नाही याची कल्पना मुलांना येत नाही. त्यात ते कधी कधी गोंधळून जातात. हे त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने घातक आहे. तेव्हा देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य वर्षापासून मोबाइलचा अतिवापर करणार नाही यासाठी केवळ विद्यार्थीच नव्हे तर आपण सर्वजणांनी आज वचनबद्ध होऊया.

मोबाइलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. ही त्यांच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून धोक्याची घंटा आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे सुजाण नागरिक आहेत त्यामुळे त्यांनी मोबाइलचा अतिवापर टाळावा. मोबाइलचा वापर आवश्यक कामासाठीच करण्यात यावा. सध्या तरी विद्यार्थ्यांना मोबाइलचे व्यसन लागले आहे. कायम त्यांच्या हातात मोबाइल दिसतो, तो दूर ठेवणे आवश्यक आहे. याचा परिणाम त्यांच्या डोळ्यांना त्रास होणे, झोप न लागणे, मानसिक दडपण, मन चलबिचल होणे, थोरांचे ऐकायचे नाही, मनमानी कारभार, मान व पाठ दुखी अशा अनेक समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. काही मुले तर झोपेत सुद्धा हातात मोबाइल धरून झोपतात. त्यात काही उशीच्या खाली लपवून मोबाइल ठेवतात. डॉक्टर सांगतात, आपण झोपताना मोबाइल दूर ठेवावा, याचे काय? तेव्हा देशातील सुजाण नागरिकांनी विचार करून उद्यापासून म्हणण्यापेक्षा आजपासून मोबाइलला दूर ठेवून योग्य ती काळजी घेतली पाहिजे. आजच्या युगात मोबाइल ही मूलभूत गरज झाली असली तरी त्याचा अतिवापर टाळावा. तेव्हा यात इतरांना दोष देण्यापेक्षा आई-वडिलांची भूमिका महत्त्वाची असते. मात्र हल्ली काही मुले आई-वडिलांचे ऐकत नाहीत.

तुम्हाला काय कळते? असा प्रती सवाल आपल्या आई-वडिलांना करतात. तेव्हा घरात भांडण नको म्हणून आई-वडील दुर्लक्ष करतात. अलीकडे तर मोबाइलचा विचार करता मोबाइलच्या अतिवापरामुळे मुलांची पुरेशी झोप होत नाही. म्हणजे कारण नसताना जागरण होते. हे जागरण आरोग्याला अपायकारक असते. याऐवजी एखादा खेळ खेळणे गरजेचे आहे. म्हणजे तेवढा ताण डोळ्यांवर येत नाही. म्हणूनच आवश्यक कामासाठी मोबाइलचा वापर करावा म्हणजे मोबाइलचा वापर कमी होईल किंवा मोबाइल वापरण्यावर मर्यादा येईल. ही आरोग्यासाठी चांगली बाब आहे. मी आवश्यक कामासाठी मोबाइलचा वापर करीन असे प्रत्येकांनी ठरविले पाहिजे. तसेच मोबाइलवर जास्त न बोलता आवश्यक तेवढेच बोलेन असे ठरवावे. त्यासाठी प्रत्येकांनी वेळेचे नियोजन करणे गरजेचे आहे. केवळ मोबाइलवर वेळ घालविण्यापेक्षा आपल्या कुटुंबीयांसमवेत व मित्रांसोबत काही वेळ गप्पागोष्टीत घालवावा. तेवढे मन मोकळे होते. महत्त्वाची बाब म्हणजे, अशांसोबत मनमोकळेपणाने वेळ घालवावा, यातूनच खरी ऊर्जा मिळते. आजच्या तरुणाईला अशा गप्पागोष्टींची गरज आहे. तेव्हा मोबाइलच्या वापरावर स्वत:हून निर्बंध घातले पाहिजेत. उदाहरणार्थ सकाळी चहा, नाश्ता, जेवण करताना मोबाइलवर बोलू नये. तसेच झोपल्यावर मोबाइल आपल्यापासून दूर ठेवावा. केवळ मोबाइल एके मोबाइल नको तर आपल्याला मनोरंजनाकडे सुद्धा लक्ष द्यावे लागेल. मनोरंजनामुळे आपले मनोरंजन होत असते, त्याचप्रमाणे मन सुद्धा मोकळे झाल्याने कोणत्याही प्रकारचे दडपण येत नाही. तेवढा डोळ्यांना सुद्धा आराम मिळतो. एखाद्या विषयावर एकमेकांशी सुसंवाद साधावा म्हणजे तेवढीच आपल्या ज्ञानात भर पडत असते. त्यात अधिक आराम हवा असेल तर काही काळ मोबाइल बंद करून ठेवल्यास अधिक चांगले. मात्र कामात अडथळा येणार नाही याची काळजी घ्यावी. काही वेळा आपल्या कुटुंबाचा सल्ला घ्यायला काहीच हरकत नाही. त्याचे पालन करणे आपल्या हातात आहे. चांगल्या सल्ल्यामुळे आपले मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत होते. कारण घरगुती सल्ला हा अनुभवातून व मोफत असतो, हे विसरता कामा नये.मोबाइलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होऊ लागले आहेत. याचा सर्वात जास्त दुष्परिणाम डोळ्यांवर झालेला दिसून येत आहे. याचा परिणाम अतिवापर करणाऱ्या मोबाइलधारकांच्या शरीरावर होऊ लागला आहे. ही त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने चांगली गोष्ट नाही. तेव्हा मोबाइलच्या दुष्परिणामाविषयी जनजागृती होणे आवश्यक आहे. आपल्याकडे अपेक्षेप्रमाणे मोबाइलच्या अतिवापरा संदर्भातील दुष्परिणामाबाबत जनजागृती होत नाही. ती होणे गरजेचे आहे. यासाठी आरोग्य विभागाने व जागृत नागरिकांनी पुढे येऊन आवाज उठविला पाहिजे. ही विद्यार्थ्यांसाठी आजच्या काळाची गरज आहे. कारण भारत हा तरुणांचा देश आहे, असे आपल्या देशाचे माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे आपल्या भाषणात म्हणत असतात. तेव्हा देशातील तरुण तंदुरुस्त होण्यासाठी त्याला मोबाइलच्या अतिवापराच्या दृष्ट चक्रातून बाहेर काढावे लागेल. तसेच मुलांनी सुद्धा मोबाइलचे दुष्परिणाम लक्षात घेऊन सतर्क राहायला हवे. तेव्हा देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य वर्षांत सध्याच्या विद्यार्थ्यांना भविष्यात निरोगी जीवनशैली जगण्यासाठी आतापासून मोबाइलचा अतिवापर टाळण्यासाठी जागरूत करूया.

# श्रीगणेश विघ्नहर्ता व बुद्धीमत्तेचे अथांग महासागर



संपूर्ण सृष्टीचे पालनहार देवाधिदेव महादेव भोले शंकर,तर त्यांचे पुत्र गणपती बाप्पा विघ्नहर्ता व ज्ञानदाता सागर आहेत. त्यामुळेच श्रीगणेशांना सर्वच बाबतीत प्रथम स्थान देण्यात आले आहे. गणपती बाप्पा हिंदू धर्मातील आराध्य दैवत मानल्या जाते. कोणतीही पुजा-अर्चना असो सर्वप्रथम श्रीगणेशाची पूजा केली जाते.नंतरच इतर देवतांची पूजा केली जाते.कारण श्रीगणेश म्हणजे बुद्धीचा सागर,शांतीचे प्रतीक व बालगोपालांचे आवडते दैवत.देशात कोणत्याही देवी-देवतांची पुजा असो,परंतु आरतीची सुरूवात गणपतीच्या आरती पासून होत असते.याचाच अर्थ पृथ्वीतलावर गणेश वंदनेला सर्वप्रथम प्राधान्य देण्यात येते.रावणासारख्या महाकाय शक्तीला रोखण्याचे काम सुध्दा श्रीगणेशांनी केले.श्रीगणेशांना अनेक नावांनी संबोधले जाते गौरी पुत्र,अष्टविनायक अशा अनेक नावांनी श्रीगणेशांची पुजाअर्चना केली जाते.गणेशजी देवता आदिदेव असल्याने त्यांचे प्रत्येक युगात वेगवेगळे अवतार पहायला मिळतात.गणेशजीला चार हात असतात हे चारही हात म्हणजे वेगवेगळ्या दिशांमध्ये व्यापकतेचे प्रतिक मानल्या जाते.देवी पार्वती आंघोळीला गेली असता गणपतीला पार्वतीने सांगितले की माझी आंघोळ होत नाही तोपर्यंत घरात कुणालाही प्रवेश द्यायचा नाही.गणपतीने आई पार्वतीला वचन दिले की ठीक आहे.कोणालाही घरात प्रवेश करू देणार नाही. परंतु तेवढ्यात भगवान शंकरजी दारात आले आणि म्हणाले की बेटा हे माझे घर आहे मला घरात जाऊदे.गणेशजीने भगवान शंकरजीना प्रवेश नाकारला व क्रोधित होवून गणपतीचे डोके त्याच्या धडापासून वेगळे केले.हे पाहुण आई विचलित झाली व काही क्षणातच शंकरजीला आपली चूक लक्षात आली आणि आपल्या दैवी शक्तीच्या आधारावर गणपतीच्या धड्यावर गजाचे मस्त ठेवले आणि गणपतीला जिवदान मिळाले.भगवान शंकरजीनी आपली चुक कबुल करत संपूर्ण ब्रम्हांडात गर्जना केली की पुजेचा पहिला मान गणपतीला दिला जाईल असे गणपतीला वर्दान दिले.म्हणुनच गणपतीची प्रथम पुजा केली जाते.श्रीगणेशजी विवाहित होते त्यांना दोन बायका होत्या एकीचं नाव रिद्धी आणि दुसरीचे नाव सिद्धी होते.यांना दोन मुलं होती शुभ आणि लाभ त्यामुळे प्रथम पुजा गणेशची होते व सोबतच शुभ-लाभ दिसून येते.यात आपल्याला सर्वत्र शुभ संकेत दिसून येतात.आपल्याला अनेक पुराणांमध्ये गणपतीचे अनेक नावे पहायला मिळतात यात एकदंत, विनायक, लंबोदर,भालचंद्र,गजानन इत्यादी विभिन्न नावांनी आपण श्रीगणेशाची आराधना करीत असतो. त्याचप्रमाणे ज्योतिष शास्त्रानुसार श्रीगणेशांना केतू म्हणून ओळखले जाते केतू हा शांत ग्रह असल्याने संपूर्ण सृष्टीत सावलीची भुमिका पार पाडते व राहु ग्रहांच्या विरोधात सदैव ठाम भूमिका बजावीत असते.त्यामुळेच म्हणतात विरोधाशिवाय ज्ञान नसते आणि ज्ञानाशिवाय मुक्ती नसते. त्यामुळे गणपती देवता हिंदू धर्मातील बुद्धीचा अधिष्ठाता, विघ्नांचा नियंत्रक मानला जाणारा देव आहे म्हणूनच श्रीगणेशाला आपण विघ्नहर्ता म्हणतो.भारत अनेक धर्मांनी, जाती-पंथाने विनलेला देश आहे.त्यामुळे प्रत्येक धर्म आपापल्या पद्धतीने आपापल्या संस्कृती प्रमाणे सण साजरे करतांना दिसतात.भारतात प्रत्येक दिवसाला वेगवेगळ्या देवी-देवतांची महत्त्व आहे त्यापध्दतीने पुजा-अर्चना केली जाते.प्रत्येक गणेश चतुर्थीला गणेशाची आराधना करून भक्तगण आपली मनोकामना पूर्ण करण्याचा सर्वच प्रयत्न करतात.परंतु भाद्रपद महिन्यातील शुद्ध चतुर्थी म्हणजे गणेशोत्सव.गणेशमुर्तीची स्थापना करून गणेशोत्सव तब्बल १० दिवस चालतो.या कालावधीत महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात आपल्याला रोषणाईची झगमगाट दिसून येते.यापध्दतीने गणेशोत्सवाचा आनंद संपूर्ण लोक मोठ्या उत्साहाने व गुना गोविंदाने साजरा करतात.लोक गणेशोत्सवात इतके तल्लीन होऊन जातात की १० दिवस कसे गेले हे कोणालाच कळत नाही.गणपती बाप्पा पुन्हा लवकर यावा यासाठी गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर याघोषणांचा गजर करत गणपती बाप्पाला निरोप दिला जातो.इंग्रजांना शह देण्यासाठीच लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरूवात केली.गणेशोत्सवाच्या निमित्ताने जनजागृती करून इंग्रजां विरूद्ध मोठा लढा उभारला व आक्रमक पवित्रा निर्माण केला.त्यामुळे गणेशोत्सव हा सण स्वतंत्र लढ्यासाठी सूध्दा कारगर सिध्द झाला.लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची लावलेली परंपरा आजही संपूर्ण महाराष्ट्रासह भारतात दिसुन येते. त्यामुळेच महाराष्ट्रात गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.पुराणानुसार परशुराम एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय करून कैलासी आले असता दरबार रक्षक गणेशाने त्यास अडवले व दोघांमध्ये घनघोर युद्ध झाले.यात परशुरामाच्या परशुमुळे गणेशाचा एक दात तुटला त्यामुळे श्रीगणेशांना एकदंत सूध्दा म्हणतात असे पुराणामध्ये नमुद आहे.गणेशाला पुजेचे स्थान प्रथम असल्याने आपण पाहतो प्रत्येक मंदिरात आपल्याला गणेशाची मूर्ती दिसुन येते ते मग कोणतेही मंदिर असो. गणेशाचे मुख्य वाहन मुशकराज (उंदीर) त्यामुळे श्रीगणेशा सोबतच उंदराची सूध्दा पुजा-अर्चना केली जाते.पुजेमध्ये मुख्यत्वेकरून दुर्वा,बेल-फुल,शम्मीपत्र, शेंदूर यांचा वापर होतो.भारतात श्रीगणेशांची अनेक मोठ-मोठी मंदिरे आहेत.त्याचबरोबर नेपाळमध्ये आपल्याला गणेशाची असंख्य मंदिरे पहायला मिळतात.कारण श्रीगणेश हे विघ्नहर्ता आहेत त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक घरामध्ये मुख्य दारावर गणपतीची फोटो आपल्याला दिसुन येते.मानवजातीला द्वेी-देवतांनी पृथ्वीची रक्षा करण्यासाठी पृथ्वीतलावर जन्म दिला.परंतु मानवजातीने या धरतीमातेचा दुरूपयोग केल्यामुळे पृथ्वीतलावरील निसर्गाचा दिवसेंदिवस ह्यास होत आहे.याला वाचविण्यासाठी गणेशोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात १० दिवस वृक्ष लागवडीची मोहीम सरकार मार्फत,प्रशासना मार्फत, शाळा - महाविद्यालय, सामाजिक संस्थांमार्फत व संपूर्ण गणेश मंडळांच्या मार्फत वृक्षारोपण व्हायला पाहिजे.यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल व येणारे महाप्रलय रोखण्यास मोठी मदत होईल, पृथ्वीचे संतुलन राखण्यास मोठी मदत होईल व सर्वत्र हिरवागार गालिचा पसरलेला दिसुन येईल.यातही आपल्याला गणेशोत्सवाचा आनंद अवश्य दिसून येईल.गणपती बाप्पा मोरया!

-रमेश कृष्णराव लांजेवार

# देवेंद्र फडणवीस मराठा नाहीत ही चूक आहे का?:मराठा आरक्षणासाठी सर्वाधिक काम त्यांनीच केले-बावनकुळे

**कोराडी (वृत्तसंस्था)**-मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. मराठा समाजाला वेगळे आरक्षण दिले पाहिजे ही आमची भूमिका आहे, आमचे मुख्यमंत्री याच भूमिकेचे आहेत. ५० वर्षे शरद पवार आणि काँग्रेसचे मराठा नेते मुख्यमंत्रिपदावर होते पण कधीही त्यांनी मराठा समाजासाठी निर्णय घेतला नाही. देवेंद्र फडणवीस यांनी सरकार आल्यानंतर मराठा समाजासाठी आरक्षणाचा निर्णय घेतला. यानंतर हायकोर्ट, सुप्रीम कोर्टात हे आरक्षण टिकले हे सर्व फडणवीसांच्या सरकारमध्ये झाले, असे भाजपचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, यानंतर एकनाथ शिंदेंनी यासाठी पुढाकार घेतला आणि आता पुन्हा देवेंद्र फडणवीस हे पुढाकार घेत आहे. त्यांनी मराठा आरक्षणासाठी पुढाकार घेऊन आणि वेगवेगळ्या माध्यमातून मागण्या मान्य करत असतानाही बाकी नेत्यांना सोडून केवळ देवेंद्र फडणवीस यांना टार्गेट करणे त्यांच्याबद्दल एकेरी बोललं जात आहे. देवेंद्र फडणवीस मराठा नाही ही चूक आहे का?, खऱ्या अर्थाने ही चूक आहे का? त्यांना टार्गेट करणे सुरू आहे ते योग्य नाही. तुम्ही मागण्या करा पण मराठा समाजाच्या माध्यमातून तुम्ही एका नेत्याला टार्गेट करणं योग्य नाही.मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे याच भूमिकेतून आम्ही काम केले आहे. पण काँग्रेस पक्षाचे नेमके मत काय याची स्पष्टता ली पाहिजे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यावरून दुमत नाहीच पण काँग्रेस पक्षाने स्पष्ट केले पाहिजे की मागासवर्गीय समाजाचे आरक्षण काढून मराठा समाजाला आरक्षण देण्याचा आपला निर्णय आहे का? किंवा मराठा समाजाला वेगळं आरक्षण देण्यात यावे या विषयी आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे, असे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मागास ३५३ जातीचा आणि १८ पगड जातीचा ओबीसी समाज यांचे आरक्षण काढून आपण इतर समाजाला द्यायचे का? हा जो संवैधानिक प्रश्न आहे, यावर काँग्रेसचे मत काय? त्यांनी जरा खुले समर्थन दिले असेल तर ते ओबीसी विरोधात आहे. ओबीसीच्या समर्थनार्थ राहुल गांधी एकीकडे बोलत असतात, जातीय जन-गणनेची मागणी करतात आणि दुसरीकडे असे नौटंकी करणे यामुळे त्यांनी भूमिका स्पष्ट करण्याची गरज आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मनोज जरांगे यांची भेट सरकारने घेतलीच पाहिजे. आंदोलनकर्त्यांचे मत आपण समजून घेतले पाहिजे पण कोणताही निर्णय घेत असताना एका समाजाचे आरक्षण काढून दुसऱ्या समाजाला देणं यावर शासन योग्य निर्णय घेईल. काँग्रेसच्या भूमिकेवर स्पष्टता आली पाहिजे. कोणत्याही समाजाचे आरक्षण कमी होता कामा नये. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. मराठा समाजाला वेगळे आरक्षण दिले पाहिजे ही आमची भूमिका आहे, आमचे मुख्यमंत्री याच भूमिकेचे आहेत.



# शेतकऱ्यांचे नुकसान होऊ देणार नाही-पंतप्रधान मोदी

**अहमदाबाद । वृत्तसंस्था**


शेतकरी, लघु उद्योजक आणि पशुपालकांचे हित हेच माझ्यासाठी सर्वोच्च असल्याचे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी अहमदाबाद येथे दिले. अमेरिका भारतावर २७ ऑगस्टपासून ५० टक्के टॅरिफ लादत असतानाही, भारतातील शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान होऊ देणार नाही, असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला.पंतप्रधान म्हणाले की, कितीही दबाव आला तरीही माझे सरकार लघू उद्योजक, शेतकरी आणि पशुपालकांचे हित जपेल. आम्ही सहनशक्ती वाढवत आहोत आणि कोणत्याही परिस्थितीत त्यांचे नुकसान होणार नाही याची मी खात्री देतो असे आश्वासन दिले. यावेळी



त्यांनी ऑपरेशन सिंदूरचा आणि काँग्रेसच्या धोरणांचा उल्लेख करत सांगितले की, जगाने पाहिले आहे की आम्ही पहलगाम नरसंहाराचा बदला २२ मिनिटांत घेतला. गुजरात ही दोन मोहनांची भूमी आहे - सुदर्शनधारी आणि चरखाधारी. एकाने देशाला सैन्यशक्तीचे प्रतीक बनवले, तर दुसऱ्याने आत्मनिर्भरतेचा मार्ग दाखवला. पंतप्रधान मोदी हे २५ आणि २६ ऑगस्ट रोजी गुजरातच्या दौऱ्यावर असून, त्यांनी अहमदाबादमध्ये सुमारे ३ किलोमीटरचा रोड शो केला. नरोडा ते निकोल मार्गावर झालेल्या या रोड शोमध्ये त्यांनी जनतेला हात हलवत अभिवादन केले.यावेळी मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पंतप्रधानांनी या दौऱ्यात ५४७७ कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन केले. यामध्ये साबरमती ते काटोसनदरम्यान धावणाऱ्या नव्या ट्रेनला हिरवा झेंडा दाखवण्यात आला.

# विरार दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू मुख्यमंत्र्यांकडून ५ लाखांची मदत





**मुंबई । प्रतिनिधी**

विरार भागात एक इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झालेला आहे, याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे आणि मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. या सर्व कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असे सांगतानाच मृतांच्या वारसांना ५ लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केली आहे.४८ तासांपासून एनडीआरएफच्या मदतीने हे बचाव कार्य राबवले जात आहे आणि ते पुढच्या काही तासात संपेल. आतापर्यंत ९ जणांना सुरक्षित वाचविण्यात आले आहे.

# उरण तालुक्यातील तरुणांचा शिवसेनेत पक्ष प्रवेश



**मुंबई । प्रतिनिधी**

गोरगरिबांच्या कल्याणासाठी शिवसेना पक्ष रात्रं दिवस कार्यरत असून पक्षाने गोरगरिबांना मोठया प्रमाणात आधार दिला आहे. शिवसेनेचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांनी अनेक लोक कल्याण कारी निर्णय घेतले आहेत. त्यामुळे जन माणसात शिवसेनेची प्रतिमा उंचावली आहे. शिवसेनेप्रती लोकांचा आदर मोठया प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे आज प्रत्येकजण शिवसेनेकडे आकर्षित होत आहेत. अनेक जण मोठया प्रमाणात पक्ष प्रवेश देखील करत आहेत.शिवसेना पक्षाचे मुख्य नेते महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या कार्याप्रणालीवर विश्वास ठेवून उरण मधील तरुणांनी शिवसेनेत पक्ष प्रवेश केला.मावळचे लाडके खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या हस्ते पनवेल मधील जनसंपर्क कार्यालयात उरण विधानसभेतील कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश करण्यात आला.रोहित बाळासाहेब मस्के राहणार नागाव म्हातवली,प्रणय प्रमोद वाघमारे राहणार द्रोणागिरी,मयूर दत्ता पाटील राहणार द्रोणागिरी,गणेश महादेव भिरजदार राहणार केगाव,अनिल निमंग्रे राहणार मुळेखंड यांनी नुकताच शिवसेनेत पक्ष प्रवेश केला.या प्रसंगी विधानसभा संपर्क प्रमुख रमेश म्हात्रे तसेच उरण तालूका प्रमुख दिपक ठाकूर, उरण तालूका ग्राहक संरक्षण कक्ष वीरू चाळके,भावेश भोईर व उपशाखाप्रमुख उपस्थित होते.तरुण वर्ग मोठया प्रमाणात शिवसेनेत पक्ष प्रवेश करीत असून यामुळे शिवसेना पक्ष अधिक मजबूत, व्यापक होण्यास मदत होत आहे. पक्ष प्रवेश मुळे संघटना व पक्षाचे आचार विचारतळागाळात पोहोचण्यास मदत होणार आहे.

# राजुरा मतदारसंघातील विविध प्रश्नांवर मुख्यमंत्री व मंत्र्यांकडे आमदार देवराव भोंगळे यांचा पाठपुरावा

**मुंबई । प्रतिनिधी**

राजुरा विधानसभा मतदारसंघातील विकासात्मक व जनहिताचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी आमदार देवराव भोंगळे यांनी मुंबई मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक मंत्र्यांची भेट घेतली. कॅबिनेट बैठकीच्या निमित्ताने झालेल्या या चर्चेत मतदारसंघातील महत्त्वाच्या मागण्या त्यांनी मांडल्या.आमदार भोंगळे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना अलीकडेच विरूर स्टेशन येथे झालेल्या महाआरोग्य शिबिराची तसेच राजुरा, गोंडपिपरी, कोरपना, गडचांदूर, जिवती व नांदा येथे आमचा देवाभाऊ रक्षाबंधन सोहळ्याचा अहवाल सादर केला. यावेळी गोंडपिपरी तालुक्यातील एमआयडीसीअंतर्गत ४३०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी झालेल्या सामंजस्य कराराबद्दल त्यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.गोंडपिपरी ग्रामीण रुग्णालयाच्या बांधकामाला हायपावर कमिटीची मान्यता मिळावी,



तसेच राजुरा शहरातील मुख्य मार्गावरील परवानगीशिवाय तोडण्यात आलेल्या जांभळी व चिचवा या झाडांप्रकरणी कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. याचबरोबर, राजुरा-चुनाळा-धानोरा-अंतरगाव-अन्नुर या महत्त्वाच्या रस्त्याची दुरवस्था लक्षात घेऊन एडीबी अंतर्गत तातडीने निधी मंजूर करावा, अशी विनंतीही त्यांनी केली.राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे जिवती तालुक्यातील वनजमीन पट्ट्यांचा प्रश्न, सिमावर्ती १४ गावांचा प्रश्न, राजुरा शहरातील देशपांडेवाडीतील वर्ग २ प्रकरण तसेच जिवती तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी अग्रिस्टाक आयडीसंदर्भात शिथिलता देण्याची मागणी त्यांनी केली. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे व पणनमंत्री जयकुमार रावल यांच्याशी झालेल्या चर्चेत शेतकऱ्यांना संगणकीकृत सातबारा नोंदी नसल्याने हस्तलिखित सातबाऱ्यावरच कपास किसान अप्लिकेशन वर नोंदणी करण्याची परवानगी द्यावी अशी मागणी करण्यात आली.तसेच, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेऊन जिवती ग्रामीण रुग्णालयाच्या ३० खाटांच्या पहिल्या मजल्याच्या बांधकामासाठी अंदाजपत्र कालाप्रशासकीय मान्यता मिळावी, अशी मागणी आमदार भोंगळे यांनी केली. या सर्व विषयांवर मुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांनी सकारात्मक आश्वासन दिल्याने मतदारसंघातील प्रश्न मार्गी लागतील, असा विश्वास आमदार देवराव भोंगळे यांनी व्यक्त केला.

# आ.जोरगेवार यांच्या प्रयत्नांमुळे चंद्रपूर-घुग्घुसकरांना दिलासा : कायमस्वरूपी पट्ट्यांचा मार्ग मोकळा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आमदार किशोर जोरगेवार यांच्या मागणीनंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुंबई मंत्रालयात बैठक घेऊन चंद्रपूर आणि घुग्घुस येथील नझूल धारकांना कायमस्वरूपी पट्टे देण्याची प्रक्रिया गतीशील करण्याचे निर्देश दिले आहेत. यासाठीच्या सर्वेक्षणाकरिता पाच एजन्सी नियुक्त करून त्याचा खर्च खनिज विकास निधीतून करण्याचे निर्देशही ना. बावनकुळे यांनी दिले असून सहा महिन्यांत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत.

चंद्रपूर आणि घुग्घुस येथील नझूल धारकांना कायमस्वरूपी घरपट्टे देण्यात यावेत, तसेच विविध विषयांवर बैठक घेण्यात यावी, अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी केली होती. या मागणीची दखल घेऊन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी मुंबई मंत्रालयात बैठक घेण्यात आली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. बैठकीला आमदार किशोर जोरगेवार, महसूल विभागाचे सहसचिव संजय बनकर, अवर सचिव आश्विनी यमगर, चंद्रपूर जिल्हाधिकारी विनय गौडा उपस्थित होते. तर महसूल विभागाचे उपविभागीय अधिकारी संजय पवार, निवासी उपजिल्हाधिकारी डी. एस. कुंभार, तहसीलदार विजय पवार, मनपाचे अप्पर आयुक्त चंदन पाटील, उपायुक्त चीद्रावार, संजय गांधी योजनेंतर्गत तहसीलदार सीमा गजभिये, जिल्हा नगर प्रशासन अधिकारी गायकवाड आदी अधिकारी व्हिसीच्या माध्यमातून उपस्थिती होती.

चंद्रपूर शहरात नझूल जागेवर मोठी लोकवस्ती असून या नागरिकांकडे कायमस्वरूपी पट्टे नसल्याने त्यांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. मागील ५० ते ७० वर्षांपासून वास्तव्यास असूनही पट्टे न मिळाल्याने येथील नागरिक सतत मागणी करत होते. याच मागणीसंदर्भात आमदार किशोर जोरगेवार यांनी शासनाशी सातत्याने पाठपुरावा केला. त्याचे फलित स्वरूप महसूल मंत्री यांनी सदर विषयावर बैठक घेतली. या बैठकीत सर्वेक्षण पूर्ण झालेल्या ७०० नागरिकांना तात्काळ पट्टे वाटप करण्याचे आदेश देण्यात आले.चंद्रपूर शहरात ३९ झोपडपट्टी नझुलच्या जागेवर असल्याची नोंद मनपाकडे आहे. यातील १४ झोडपट्टांचे सर्वेक्षण झाले आहे. तर उर्वरित झोडपट्टींचे सर्वेक्षण सुरु आहे.



मात्र सध्या एकाच एजन्सीमार्फत सर्वेक्षण सुरू असल्याने काम संथ गतीने सुरू असल्याचे आमदार जोरगेवार यांनी निदर्शनास आणून दिले. त्यानंतर महसूल मंत्री बावनकुळे यांनी पाच एजन्सींची नियुक्ती करण्याचे आदेश दिले. सर्वेक्षणाचा खर्च खनिज विकास निधीतून करण्याचेही निर्देशही यावेळी देण्यात आले. त्यामुळे आता शहरातील जवळपास १८ हजार घरांना पट्टे मिळणार आहेत. त्यासोबतच घुग्घुस येथील नझूल धारक नागरिकांनाही पट्टे देण्यात येणार आहेत.याशिवाय संजय गांधी योजनेंतर्गत तहसीलदारांची रिक्त पदे तातडीने भरून लाभार्थ्यांना योजनांचा लाभ वेळेत मिळावा, यासाठी कार्यवाही करण्याचे आदेश महसूल मंत्र्यांनी दिले. तसेच नझूल प्रकरणांसाठी स्वतंत्र तलाठी नेमण्यास मान्यता देण्यात आली आहे. घुग्घुससाठी स्वतंत्र क्रीडांगणाची जुनी मागणी आमदार जोरगेवार यांनी बैठकीत मांडली. त्यानुसार जागेची अडचण दूर करून प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी सादर करावा, असे निर्देश देण्यात आले. याशिवाय घुग्घुस परिसरात अप्पर तहसील कार्यालयासही मंजुरी देण्यात आली असून त्यामुळे स्थानिक नागरिकांना प्रशासकीय कामांसाठी चंद्रपूरला जाण्याची गरज भासणार नाही. आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारामुळेच या बैठकीत मतदार संघातील प्रश्न प्राधान्याने चर्चेत आले. त्यांच्या ठाम भूमिकेमुळे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या मागण्यांना गती मिळणार असून चंद्रपूर-घुग्घुस परिसरातील नागरिकांना दिलासा मिळणार आहे. या बैठकीला चंद्रपूर भाजपा जिल्हाध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, ज्येष्ठ नेते प्रकाशभाऊ देवतळे, नामदेवभाऊ डाहुले, भाजपा महामंत्री रवींद्र गुरनुले, शाम कणकम, सविताताई दंडारे, घुग्घुस शहराध्यक्ष संजय तिवारी, माजी नगरसेविका कल्पनाताई बगुलकर, आदी मान्यवर उपस्थित होते.

# साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या पाच विद्यार्थ्यांचा व प्रा.डॉ.कविता गित्ते यांचा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते क्रीडा दिनी सन्मान

**केज । प्रतिनिधी**

दिनांक २९ आगष्ट २०२५ रोजी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड यांच्या वतीने क्रीडा दिना निमित्त राष्ट्रीयपातळीवर प्राविण्य प्राप्त व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्रशिक्षक व मार्गदर्शकांचा सन्मान जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड येथे करण्यात आला.यात बीड जिल्ह्यातील विविध खेळात राष्ट्रीय पातळीवर प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या मार्गदर्शकांचा व प्रशिक्षकांचा देखील सन्मान जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन,जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर सर, छत्रपती पुरस्कार प्राप्त जे पी शेळके सर व इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.यात साने गुरुजींच्या दहा विद्यार्थ्यांचा खेळाडूंचा समावेश होता पैकी पाच खेळाडू उपस्थित झाल्याने पाच खेळाडूंचा माननीय जिल्हाधिकारी यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.सदर खेळाडू हे राष्ट्रीय स्तरावर बेसबॉल व सॉफ्टबॉल या खेळात २०२४ मध्ये प्राविण्य प्राप्त खेळाडू होत. तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या डॉ.कविता गिते यांचा देखील सन्मान करण्यात आला या शाळेने क्रीडा क्षेत्रात उत्तुंग अशी कामगिरी करत महाराष्ट्र राज्यात क्रीडा क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. मागील पाच वर्षात ३५ विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवर प्राविण्य प्राप्त होऊन सदर विद्यार्थी शासनाच्या खेळाडू आरक्षणात पाच टक्के मध्ये वर्ग २ या पदासाठी पात्र आहेत.तर १६५विद्यार्थी शासनाच्या पाच टक्के खेळाडू आरक्षणात वर्ग ३,वर्ग ४ या पदासाठी पात्र आहेत.तसेच जिल्हा पातळी राज्य विभाग पातळी राज्य पातळीवरील सहभाग यात जवळपास ३०० खेळाडूंचा सहभाग आहे.या सर्वांना संस्थेने खेळाच्या सर्व भौतिक सुविधा योग्य मार्गदर्शक उपलब्ध करून दिल्याने हे शक्य झाले आहे.या सर्व खेळाडूंना मार्गदर्शक कविता गित्ते मॅडम,क्रीडा शिक्षक रामदास सानप, क्षितिजा मॅडम,क्रीडा मार्गदर्शक बीड जिल्हा क्रीडा कार्यालय श्री.रेवन्नाथ शेलार यांचे मार्गदर्शन लाभत आहे. क्रीडा दिनी झालेल्या सन्मानामुळे संस्थाध्यक्ष ड.उद्धवराव कराड सर,राजेश कापसे सर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.



# नवसाला पावणाऱ्या राजमुद्रा गणपतीच्या दर्शनासाठी भाविक-भक्तांची प्रचंड गर्दी

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील पंचायती समितीच्या मैदानावर उभारण्यात आलेल्या नवसाला पावणाऱ्या राजमुद्रा गणपतीच्या ११ व्या वर्षाच्या महोत्सवाला भाविक-भक्तांची प्रचंड गर्दी उसळली आहे. गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी केवळ केज तालुक्यातीलच नव्हे, तर जिल्हाभरातून भक्तांचा ओघ सुरू आहे. श्रद्धावान भाविक गणपतीच्या चरणी आपले नवस अर्पण करून सुख, शांती, समृद्धीची प्रार्थना करत आहेत.



गणेशोत्सवाच्या निमित्ताने पंचायती समितीचे मैदान रोषणाईने उजळून निघाले आहे. लहान-मोठ्यांसाठी मनोरंजनाचे आकर्षक झोके, रहाटपाळणे, विविध प्रकारचे खाऊ व खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, खेळणी, कपडे, सजावटीच्या वस्तूंची दुकाने यामुळे उत्सवाचे वातावरण अधिकच रंगतदार झाले आहे. महिलांसाठी खास कलात्मक वस्तूंची दुकाने, मुलांसाठी खेळणी आणि खाऊ-पिऊची रेलचेल सुरू आहे.

गणेश मंडळाच्या वतीने दैनिक सकाळी व संध्याकाळी आरती, विविध धार्मिक कार्यक्रम, भजन-कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक तसेच बाहेरगावच्या कलाकारांच्या कीर्तन व प्रवचनांनी भक्तांना आध्यात्मिक उभारी मिळत आहे. तरुण मंडळींच्या उत्साहाने मंडळाची आकर्षक सजावट, देखावे आणि दिव्यांची रोषणाई लक्षवेधी ठरत आहे.

दररोजच्या आरतीनंतर मंडळाच्या वतीने भाविकांसाठी प्रसादाचे वाटप केले जात असून शिस्तबद्ध दर्शन व्यवस्थेसाठी स्वयंसेवक मंडळ दिवसरात्र कार्यरत आहे. पोलिस प्रशासन, नगरपंचायत आणि आरोग्य विभागाच्या सहकार्याने उत्सवात येणाऱ्या भाविकांसाठी विशेष सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.गणेश भक्तांचा ओघ दिवसेंदिवस वाढत असून आगामी दिवसांत अधिक भाविकांच्या गर्दीची अपेक्षा राजमुद्रा गणेश मंडळाचे सर्वेसर्वा अमर पाटील यांनी व्यक्त केली आहे. केज शहरातील राजमुद्रा गणपती उत्सव सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांसह एक उत्सव सोहळा बनला असून गावागावातील भक्तांची उपस्थिती केज तालुक्यातील एकात्मतेचे दर्शन घडवत आहे.

# 'सरदारगाथा' ने ब्राह्मणपुरीकरांना केले भावूक

**नंदुरबार । दिपक गोसावी**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनावर आधारित दोन दिवसीय 'वल्लभ ते सरदार' या संगीत-राष्ट्रभक्तीपर कार्यक्रमाचे आयोजन शहादा तालुक्यातील ब्राह्मणपुरी येथे करण्यात आले होते. नवयुवक गणेश मित्र मंडळातर्फे आयोजित या 'सरदारगाथा' कार्यक्रमात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनातील अनेक पैलू उलगडण्यात आले, ज्यामुळे उपस्थितांचे डोळे पाणावले.




कार्यक्रमाची निर्मिती, संकल्पना, लेखन आणि गायन कला शिक्षक हेमंत पाटील यांनी केले होते. त्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांचे जीवन चरित्र, स्वातंत्र्यपूर्व काळातील त्यांचे प्रयत्न, तसेच अखंड भारताच्या निर्मितीमधील त्यांचे योगदान संगीतमय आणि भावनिक पद्धतीने सादर केले. यावेळी त्यांची कन्या मनीबेन आणि स्वीय सहाय्यक व्ही.पी. मेनन यांच्या भूमिकाही प्रभावीपणे मांडण्यात आल्या.

या कार्यक्रमातील सर्वात भावनिक क्षण मनीबेनची भूमिका साकारणाऱ्या अनामिका चौधरी यांच्या निवेदनादरम्यान आला. त्यांनी आपल्या वडिलांनी (सरदार पटेल) केलेल्या त्याग आणि आईच्या निधनानंतर त्यांनी कसा सांभाळ केला, याचे वर्णन केले. हे ऐकून अनेक महिलांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले.

या कार्यक्रमाला अजय शर्मा, डॉ. अजित पाटील, रमाकांत पाटील यांच्यासह अनेक मान्यवर तसेच 'सरदारगाथा' समितीचे सदस्य उपस्थित होते. या यशस्वी कार्यक्रमासाठी नवयुवक गणेश मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# क्रांती ज्योती गणेश मित्र मंडळ तर्फे सोनवद गावात रक्तदान शिबिर



**वडाळी । लाला चव्हाण**

क्रांती ज्योती गणेश मित्र मंडळ सोनवद तर्फे गावात रक्तदान शिबिर घेत मंडळाने एक नवीन उपक्रम राबवून रक्तदान बद्दल ग्रामीण भागात देखील जागरूकता यावी या हेतूने शिबिर आयोजित केले. आणि गावातून लोकांचा प्रतिसाद देखील चांगला मिळाला तसेच तरुणांनी मोठ्या संख्येने रक्तदान केले असून महिलांनी ही पुढाकार रक्तदान केले. क्रांती ज्योती गणेश मित्र मंडळ यांनी रक्तदानाबद्दल जनजागृती तसेच गरीब गरजू लोकांना रक्त मोफत मिळावे या हेतूने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.शासकीय जिल्हा रुग्णालय नंदुरबार येथील ब्लड बँक ला रक्त दिले आणि जिल्हा रुग्णालय येथील डॉक्टरांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# विजय क्रीडा गौरव महोत्सव: नंदुरबारमध्ये रस्सीखेच, फुटबॉल, आणि लंगडी स्पर्धांनी विद्यार्थ्यांनी दाखवले क्रीडा कौशल्य.

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा डॉ. सुप्रिया गावीत यांच्या वाढदिवसानिमित्त विजय क्रीडा गौरव महोत्सव समितीने आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रचंड उत्साह दाखवला. सुरुवातीला पावसामुळे थांबलेल्या रस्सीखेच, फुटबॉल, आणि लंगडी या मैदानी स्पर्धा ३० आणि ३१ ऑगस्ट रोजी श्रॉफ हायस्कूल, एस.ए. मिशन हायस्कूल आणि जिल्हा क्रीडा संकुल येथे यशस्वीरित्या पार पडल्या.



माजी आदिवासी विकास मंत्री आणि आमदार डॉ. विजयकुमार गावित, माजी खासदार डॉ. हिनाताई गावित, आणि डॉ. सुप्रिया गावीत यांच्या हस्ते या स्पर्धांचे उद्घाटन झाले. या स्पर्धांमध्ये, मोठ्या शाळांमधील विद्यार्थ्यांपेक्षा नगरपालिकांच्या आणि इतर छोट्या शाळांमधील आदिवासी विद्यार्थ्यांनी दाखवलेले कौशल्य विशेष कौतुकास्पद ठरले. त्यांच्या कामगिरीवरून नंदुरबार जिल्ह्यामध्ये ऍथलेटिक्ससाठी उत्तम खेळाडूंचा भरणा असल्याचे दिसून आले, ज्यामुळे भविष्यात जिल्हा ऍथलेटिक्समध्येही प्रगती करू शकतो, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष दीपक पाटील, माजी तालुका अध्यक्ष जे.एन.पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य सागर तांबोळी, प्रवीण पाटील, डॉ. मनोज गिरासे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेचे पंच म्हणून सबस्टीन जयकर, आमोश डलगे, अक्षय परदेशी, संकेत डलगे, करण चव्हाण आणि योगेश निकम यांनी जबाबदारी पार पाडली.



बीड-भटके विमुक्त दिनाचे औचित्य साधून जामखेड निवारागृह येथे वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ता अरुण आबा जाधव यांनी राज्यस्तरीय भटके विमुक्त परिषद आयोजित करून यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल बीड जिल्हा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना पत्रकार बालाजी जगतकर, जिल्हा उपाध्यक्ष पुरुषोत्तम (गोटू)वीर, अन्वर पाशा,भूषण लोळगे, सुशील काकडे आधी दिसत आहेत.

# ह.भ.प.रवींद्र महाराज डाडर यांचे हृदयस्पर्शी प्रवचन

## 'आई-वडिलांचा आशिर्वाद हाच खरा जीवनधन!' ऐकून ग्रामस्थांच्या डोळ्यांत अश्रू दाटले



**आष्टी । रविंद्रनाथ ठाकूर**

देविगव्हाण (ता.आष्टी,जि.बीड) येथे कबीर जानु वाल्हेकर यांच्या दशक्रिया विधीप्रसंगी भागवताचार्य ह.भ.प.रवींद्र महाराज डाडर (देवाची आळंदी) यांनी आई-वडिलांविषयी ।। सकल तीर्थाचिये धुरे । जियें कां मातापितरें । तयां सेवेसी कीर शरीरें । लोण कीजे ।। या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ज्ञानेश्वरी ग्रंथातील प्रमाण देत आई वडिलांच्या विषयाचा प्रसंग ओजस्वी व भावनिक करणारा उपस्थितांच्या अंत:करणाला भिडले.

आई ही देवतेपेक्षा महान असून वडील हे जीवनाचे खरे आधारस्तंभ आहेत.त्यांच्या पायातील धुळीतूनच जीवनमूल्ये, संस्कार आणि खरी संपत्ती लाभते, अशा अंत:करण हेलावून टाकणाऱ्या शब्दांनी वातावरण भारावून गेले.ग्रामस्थ, नातेवाईक आणि मान्यवरांचे डोळे अश्रूंनी पाणावले.या प्रसंगी गावातील ग्रामस्थ, बांधव, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रद्धांजली वाहिली.ह.भ.प.डाडर महाराजांच्या जीवनमूल्यांनी परिपूर्ण प्रवचनामुळे सभागृहात भक्तिभाव, कृतज्ञता व आत्मिक समाधानाची लहर पसरली.यावेळी प्रबोधनकार दत्तात्रेय बोरसे यांनीही जुन्या आठवणींना उजाळा देत भावपूर्ण प्रबोधन केले व दिवंगत कबीर वाल्हेकर यांना कृतज्ञतापूर्वक श्रद्धांजली अर्पण केली.

# पतसंस्था व संचालक यांच्या साठी धारुर येथे प्रशिक्षण वर्ग शिबीर संपन्न

**धारुर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म.पुणे चे सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर, मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांच्या संयुक्त विद्यमाने धारूर येथे पतसंस्था संचालक,कर्मचारी प्रशिक्षण वर्ग शिबीर घेण्यात आले दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गात सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर चे उपप्राचार्य श्री.एस.आर.कोळे, प्रमाणित लेखा परीक्षक सी.ए.खोडसे,एस.एस. ढगे यांनी मार्गदर्शन केले.



प्रशिक्षणात योग्य कर्ज वाटप,ऑडिट गुण निकष, उपविधी दुरूस्ती CRAR, SLR,CD RATIO नफा विभागणी सहकार कायदा इत्यादी विषयावर माहिती व सविस्तर मार्गदर्शन चर्चा करण्यात आली.

समारोप प्रसंगी मा. महादेव चोंडे,सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती,धारूर तथा संचालक,बीड जिल्हा सहकारी बोर्ड यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक,सूत्रसंचालन आभार प्रदर्शन,वर्ग संयोजन एस.आर.कोळे यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077